'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

प्रवेश पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्रवेश/ 82 /२०२५ दि.३१.०७.२०२५

## परिपत्रक क्र. ४९/ २०२५

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे
प्राचार्य यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (C.B.C.S.) प्रथम वर्ष बी.ई अभ्यासक्रमांच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तृतीय वर्षात प्रवेश देण्याबाबत.

**संदर्भ :-** १.विद्यापीठाचे परिपत्रक क्र.४३/२०२५, दि.११.०७.२०२५.
२.विद्यापीठाचे परिपत्रक क्र.४७/२०२५, दि.२२.०७.२०२५.

वरील विषयांस अनुसरुन वरील संदर्भीय क्र.२ परिपत्रक क्र.४७/२०२५, दि.२२.०७.२०२५ रद्द करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

त्या अनुषंगाने या परिपत्रकान्वे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये किंवा त्यापुर्वी पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती पॅटर्न (C.B.C.S) बी.ई वर्गांचे प्रथम वर्ष आणि व्दितीय वर्ष अनुत्तीर्ण असल्यामुळे तृतीय वर्षामध्ये प्रवेश घेऊ शकले नाही अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संबंधित अभियांत्रिकी महाविद्यालये यांनी तासिका आणि प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याच्या अटीवर तृतीय वर्षात प्रवेश द्यावेत. मात्र शैक्षणिक सवलत फक्त शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षाकरीताच लागू राहील याची नोंद घ्यावी.

**या व्यतिरिक्त गैरप्रकार समितीने शिक्षा सुनावलेल्या विद्यार्थ्यांनाही तृतीय वर्षात Carry on अंतर्गत प्रवेश देण्यात यावा.गैरप्रकार समितीने सुनावलेल्या शिक्षेच्या अधिन राहून परीक्षेस पात्र करण्यात येईल.**

तेव्हा, उपरोक्त बाब महाविद्यालयांतील विद्यार्थी / विद्यार्थ्यांनीसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

आपला विश्वासू,

( डॉ.विनोद प्र.पाटील )
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी**

१.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
२) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि.,जळगांव.
३) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगांव.
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
५) समन्वयक ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि,जळगांव.